भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2019 ◑ VK 593450

प्रतिज्ञापत्रासाठी (अनुच्छेद ४ Only For Affidavit (Article 4)

प्रतिज्ञापत्र कोणाकडे सादर करावयाचे / (For Submitting to)

प्रतिज्ञापत्रासाठी कारण / (Reason for Affidavit)

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव व राहेवाशी पत्ता प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर

Stamp Purchaser's name - Place of Residence

मुद्रांक विक्री नोंद वही अनु क्रमांक दिनांक

(Serial No./Date)

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

(Stamp Purchaser's Sign/Date)

परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याची सही व परवाना क्रमांक

परवाना मुद्रांक विक्रेत्याचे ठिकाण / पत्ता

TREASURY OFFICE SATARA

- 1 NOV 2019

STAMP HEAD CLERK

शेखर रामचंद जाधव

परवाना क्र. २३०५००६

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्या पासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

सामंजस्य करार

सामंजस्य करार

प्राचार्य, डॉ. भारत भोसले.

प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर

ता. कोरेगाव, जि. सातारा



सौ. वनिता शिंदे.

मुख्य प्रशासन अधिकारी,

माणदेशी फौंडेशन म्हसवड,

ता. माण, जि. सातारा



प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर सातारा

माणदेशी फौंडेशन म्हसवड Reg.No. Maha/4523/F 4494/Satara No-PN/CIT-III/Tech/80G/281/2011-12 Valid from 01/04/2011 until with drawn ता. माण जि. सातारा

वरील दोन संस्थामध्ये विद्यार्थिनींचे व देऊर पंचक्रोशीतील महिलांचे स्वयं कौशल्य विकसित करणेसाठी मार्ग दर्शन, अभ्यासक्रम प्रशिक्षण,प्रात्यक्षिक सराव तसेच सल्ला सेवा व एकमेकांना पुरक ठरेल अशा पध्दतीने दोन्ही ही संस्थांची एकमेकांना मदत करणेसाठी सदर करार करणेत येत आहे.

हा करार दि. ०१.०९.२०१९ ते ३१.०९.२०२४ याअ पाच वर्षासाठीच्या कालावधी करता करणेत येत असून त्यातील मुददे पुढीलप्रमाणे आहेत.

१) माणदेशी फौंडेशन म्हसवड शाखा लोणंद हे N.S.D.C. (National Skill Development Corporation) यांची नोंदणीकृत सभासद आहेत तसेच महिला स्वयंरोजगार विक्री विपणन सेवा पुरविणे महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, बचतगारांना मदत करणे, मार्गदर्शन करणे, महिलांच्या उन्नतीसाठी सर्वकश प्रयत्न करणे. हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे.

२) श्री मुधाईदेवी शिक्षणसंस्था संचलित प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर ता. कोरेगाव जि. सातारा येथे स्थापित असलेल्या महिला विकास कक्ष अंतर्गत महिला व्यवसाय प्रशिक्षण केंद्र अभ्यासक्रम मार्गदर्शन व प्रात्यक्षिके घेण्यास माणदेशी फौंडेशन म्हसवड शाखा लोणंद ही यांना सर्वोतोपरी मदत करील.

३) विद्यार्थीनी व समाजातील सर्व इच्छुक महिलांनी व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावा व स्वयंरोजगार वाढीस लागावा यासाठी दोन्हीही संस्था प्रयत्नशील असतील

४) दोन्ही संस्थामार्फत खालील कोर्सेस प्राधान्याने चालविले जातील त्याचा कालावधी पुढिलप्रमाणे असेल.

| अ.नं | कोर्सचे नाव | कालावधी | फी |
|---|---|---|---|
| १ | पाया पुसणी तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| २ | सजावटीची फुले तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| ३ | कापडी बॅग तयार करणे(१० प्रकार) | १० दिवस | ३००/- |
| ४ | पेपर बॅग तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| ५ | ज्वेलरी तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| ६ | हॅण्ड एम्ब्रॉडरी करणे | ५ दिवस | ३००/- |
| ७ | आकाश कंदील तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| ८ | राखी तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| ९ | खडू तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| १० | बिसलरी बॉटलच्या वस्तू तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| ११ | आईस्क्रीम तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| १२ | केक तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| १३ | बिस्कीट तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| १४ | चॉकलेट कॅटबरी तयार करणे | १ दिवस | ५०/- |
| १५ | टेलरिंग ब्लाऊज ड्रेस नववारी साडी | १ महिना | ५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | डिजीटल /आर्थिक साक्षरता प्रशिक्षण | १ दिवस | -------- |
| १७ | तरूण मुली व महिला उद्योजकता कार्यक्रम | १ दिवस | -------- |
| १८ | फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण | ३ महिने | १५००/- |

तसेच याशिवाय विद्यार्थिनींना उपयुक्त व आवश्यकतेनुसार कोर्सेस सुरू केले जातील

५) माणदेशी फौंडेशन म्हसवड शाखा लोणंद ही संस्था महाविद्यालयातील महिला विकास कक्ष अंतर्गत विद्यार्थिनी व इतर महिलांना प्रात्यक्षिके सरावासाठी आपल्या कार्यालयातील संगणक सॉफ्टवेअर्सचा ,शिलाई मशिन व इतर कोर्ससाठी आवश्यक साहित्य वापरास देईल . या दरम्यान विद्यार्थिनींनकडुन त्याची नुकसान भरपाई करून देण्यास महाविद्यालय मदत करेल .

६) माणदेशी फौंडेशन म्हसवड शाखा लोणंद ही संस्था महाविद्यालयातील विद्यार्थिनींनसाठी महिला विकास कक्ष अंतर्गत रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रा . संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर ता . कोरेगाव जि . शातारा येथे वस्तू तयार करून विक्री करेल यासाठी आवश्यक असणारी सर्व आर्थिकेत्तर मदत महाविद्यालय माणदेशी फौंडेशन म्हसवड शाखा लोणंद या संस्थेस करेल

७) प्रा . संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर ता . कोरेगाव जि . सातारा हे माणदेशी फौंडेशन म्हसवड शाखा, लोणंद यांना प्रशिक्षणाचे आयोजन करण्यासाठी लागणारी जागा, ब्लॅक बोर्ड, बेंच, प्रोजेक्टर, साऊंड सिस्टिम, लाईट हे उपलब्ध करून देईल व प्रशिक्षण सेवेबद्दल कोर्सच्या जमा फी पैकी ५०% रक्कम अदा करेल

८) सदर प्रशिक्षण कार्यक्रम घेत असतांना महाविद्यालयाची उपलब्ध इमारत व सामानाची काळजी माणदेश फौंडेशन म्हसवड, शाखा लोणंद यांचे प्रतिनीधी योग्य पध्दतीने घेतील यात काहीही नुकसान झाल्यास माणदेशी फौंडेशन म्हसवड, शाखा लोणंद नुकसान भरून देईल

९) या महाविद्यालयातील आजी, माजी विद्यार्थिनींना व इतर देऊर पंचक्रोशीतील महिलांना अशाप्रकारच्या प्रशिक्षणासाठी दोन्ही संस्था प्रयत्नशील असतील

१०) हा प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यासाठी लागणारे तज्ञ व अनुभवी वक्ते तसेच उद्योजक हे माणदेश फौंडेशन म्हसवड, शाखा लोणंद हे उपलब्ध करून देतील तसेच त्याचा मेहनताना देण्याची जबाबदारी व तोशिश महाविद्यालयावर राहणार नाही

११) प्रत्येक कोर्ससाठी कमीत कमी २० विद्यार्थिनी असाव्यात बी . ए . ,बी . कॉम . ,बी . एस . सी . भाग ३च्या विद्यार्थिनींना या अभ्यासक्रमासाठी जास्ती जास्त प्रोत्साहित करावे व त्यांचा सहभाग वाढवावा .

१२) हा करार विहित कालावधी करिता दोन्ही संस्थावर बंधनकारक राहिल.

१३) हा करार विहित मुदती आधी रद्द करावयाचा झाल्यास दोन्हीपैकी कोणतीही एक संस्था दुस-या संस्थेस ३0 दिवस अगोदर लेखी सुचनेव्दारे माहिती देतील व करार संपुष्टात आणतील.

सौ. वनिता शिंदे
मुख्य प्रशासन अधिकारी,
माणदेशी फौंडेशन, म्हसवड
ता. माण, जि. सातारा

डॉ. भारत भोसले.
प्राचार्य,
प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर
ता. कोरेगाव, जि. सातारा